# पोलीस दैनिक गुन्हे वार्तापत्र
# नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर
## दिनांक 02/03/2020 (सोमवार)
## (सकाळ)

---

## घरफोडी

पो.स्टे. खापरखेडा :– अंतर्गत मौजा खापरखेडा वार्ड क्र. 1 नविन बिना भानेगाव येथे दिनांक 29/02/2020 चे 18:00 वा. ते दिनांक 01/03/2020 चे 18:00 वा. दरम्यान फिर्यादी नामे– सतिश विष्णुजी ढोके, वय 41 वर्ष, रा. वार्ड क्र. 1 नविन बिना हे परिवारासह घराला कुलूप कार्यक्रमाला गेले होते. दरम्यान अज्ञात आरोपीने फिर्यादींच्या घराच्या दाराचा कुलूप तोडून घरात प्रवेश केला. तसेच आरोपीने घरातील बेडरूम मध्ये असलेली कपाटामध्ये ठेवलेले सोन्या– चांदीचे दागिने कि. 51,000/–रू. चा मुद्देमाल चोरी केले.

सदर प्रकरणी फिर्यादी यांचे रिपोर्टवरुन पो.स्टे. खापरखेडा येथे आरोपीविरुध्द कलम 454, 457, 380 भादंवि. अन्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरू आहे. सदर गुन्हयाचा पुढील तपास पोलिस हवालदार राजेश पिसे हे करीत आहे.

## चोरी

पो.स्टे. कन्हान :– अंतर्गत 1 कि.मी अंतरावर रामनगर जे.एन.रोड कन्हान येथे दिनांक 29/02/2020 चे 20:00 वा. दरम्यान फिर्यादी नामे– सौ. लिलाबाई पुरूषोत्तम कुंभलवार, वय 55 वर्ष, रा. रामनगर जे.एन.रोड कन्हान या त्यांच्या संतोष डेली निड्सच्या दुकानात ग्राहकांना सामान देत होत्या. दरम्यान फिर्यादीने दुकानासमोर खुर्चीवर ठेवलेली हॅन्डबॅग त्यामध्ये आर.डी. चे पासबुक व नगदी 13,000 /–रू. चा मुद्देमाल अज्ञात आरोपीने चोरी केले.

सदर प्रकरणी फिर्यादी यांचे रिपोर्टवरुन पो.स्टे. कन्हान येथे आरोपीविरुध्द कलम 379 भादंवि. अन्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरू आहे. सदर गुन्हयाचा पुढील तपास पोलिस हवालदार रामटेके 9284262596 हे करीत आहे.

# दुखापत

1) पो.स्टे. जलालखेडा :– अंतर्गत 06 कि.मी अंतरावर मौजा भारसिंगी येथे दिनांक 01/03/2020 चे 08:00 वा. ते 08:00 वा. दरम्यान आरोपी नामे– रूखदेव बाजीलाल कवडती, रा. भारसिंगी ता.नरखेड हा सायकलने जात असता फिर्यादी नामे– संतोष गेंदलाल धुर्वे, वय 48 वर्ष, रा. भारसिंगी ता. नरखेड यांच्या जवळ येवुन थांबला व म्हणाला की, ''तु तुझ्या मुलासाठी मुलगी पाहायला चालला, तु मला का सांगीतले नाही.'' या कारणावरून आरोपीने जवळ असलेली सायकल दोन्ही हाताने उचलुन फिर्यादिचे डोक्यावर मारून जखमी केले.

सदर प्रकरणी फिर्यादी यांचे रिपोर्ट वरून पो.स्टे. जलालखेडा येथे आरोपीविरुध्द कलम 324 भादंवि. अन्वये गुन्हा नोंद केला आहे. गुन्हयाचा पुढील तपास सहायक फौजदार सुरेश निमसळे 9922845840 हे करीत आहे.

2) पो.स्टे. कळमेश्वर :– अंतर्गत 01 कि.मी अंतरावर कळमेश्वर येथे दिनांक 29/02/2020 चे 20:00 वा. दरम्यान फिर्यादी नामे– सौ. उर्मीला रामदास सयाम, वय 45 वर्ष, रा. दहेगाव शिवार जहीर शेटे या त्यांच्या शेत मालकाच्या शेतात जेवण करण्यासाठी बसल्या होत्या. दरम्यान बाजुच्या शेतात नारायण बोरकर यांची शेती असून त्या शेतात आरोपी नामे– गोलु ठाकुर, रा. दहेगाव शिवार व त्याची पत्नी नामे– किरण या दोघांचे भांडण सुरू असतांना फिर्यादीचे पती नामे– रामदास सयाम हे त्या दोघांचा झगडा सोडवीण्यास मध्यसती गेले असता आरोपीने फिर्यादीच्या पतीचे डोक्याचे केस ओढले, त्यामुळे फिर्यादीने आरोपीचा हात पकडून ओढले असता त्याने फिर्यादीचे डाव्या हाताचे मगगटाला चावा घेवून जखमी केले.

सदर प्रकरणी फिर्यादी यांचे रिपोर्ट वरून पो.स्टे. कळमेश्वर येथे आरोपीविरुध्द कलम 324, 504, 506 भादंवि. अन्वये गुन्हा नोंद केला आहे. गुन्हयाचा पुढील तपास सहायक फौजदार निरंजन गवई 9860889550 हे करीत आहे.

पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर